संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हे पाकिस्तानच्या आर्थिक कोंडीचे लक्षण

पाकिस्तान सध्या आर्थिक संकटांशी सामना करीत आहे. स्वतःची आर्थिक स्थिती बिघडल्याने पाकिस्तानची सामाजिक स्थितीसुध्दा हाताबाहेर जाऊ लागली आहे. बेरोजगारी आणि महागाई यासारख्या समस्या अधिकाधिक वाढू लागल्या आहेत. जगातील कोणताही देश पाकिस्तानला सढळ हस्ते मदत करायला तयार नाही. एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच पाकिस्तानलाही आंतरराष्ट्रीय स्तरावर मदत मिळत असते. अशावेळी देशाचा आर्थिक डोलारा सांभाळणे आणि सामाजिक स्तरावर असंतोष निर्माण होणार नाही. याची काळजी घेणे अशा दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानला काम करावे लागत आहे. अशाही परिस्थितीत भारताशी शत्रुत्व पत्करून या देशात आधीच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला. विशेषतः या देशामध्ये ठाण मांडून बसलेले आणि सतत धर्माच्या आधारावर देशात अस्वस्थता आणि अस्थिरता ठेवणाऱ्या अतिरेक्यांमुळे या देशाचे आणखीनच नुकसान होत आहे. या सर्व आर्थिक परिस्थितीची सर्वात मोठी झळ आता लष्करालाही बसू लागलेली दिसते. पाकिस्तानच्या राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांना जरी महत्त्व असले तरी देशाची जवळपास सगळी सूत्रे लष्करातर्फे हलवली जातात. आयएसआय हे तिथले पॉवरफूल सत्ताकेंद्र मानले जाते. तिथल्या लष्कराची सर्व प्रकारची गरज पूर्ण करणे याला प्राधान्य दिले जात असतानाच भारतासारख्या देशात अतिरेकी कारवाया करण्यासाठीसुध्दा ती आयएसआय संस्था पैशांचा पुरवठा करीत असते. काश्मीरमधल्या फुटीरतावाद्यांना पोसण्याचे काम याच आयएसआय संस्थेतर्फे सुरु होते. मात्र आता ताज्या वातावरणात लष्कराला पैसा कमी पडू नये म्हणून लष्करात अनावश्यक होणारा खर्च कमी करण्याचा निर्णय याच आयएसआय संस्थेने घेतला आहे. लष्करी खर्चात कपात करण्याचा पुढाकार लष्कराने स्वतःहून घेतल्याचे चित्र पाकिस्तानतर्फे निर्माण केले गेले. परंतु लष्कर म्हणजेच आयएसआय ही संस्था आहे त्याच संस्थेने अधिकृतपणे लष्कराचा खर्च कमी करण्याची घोषणा करावी हा एक आश्चर्यजनक प्रकार ठरतो. या घोषणेचे विश्लेषण करताना अनेक गोष्टींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कदाचित तो पाकिस्तानच्या राजकीय मुत्सद्देगिरीचाही एक भाग असू शकेल किंवा अधिकाधिक परराष्ट्रीय मदत पुरवण्यासाठी केलेली एक खेळीही असू शकते.

## जगाचीही पाठ

आज फक्त चीनकडून पाकिस्तानला काही विशिष्ट अटींवर लष्करी स्वरुपाची मदत सुरु आहे. अगदी जागतिक बँकेच्यासुध्दा किंवा ज्याला आपण आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणतो त्या संस्थेनेसुध्दा अधिक मदत द्यायला फारशी उत्सुकता दाखवलेली नाही. अमेरिकेने तर यापूर्वीच बऱ्याच स्तरावरची मदत बंद केली आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापारी संबंधच बंद झाल्याने या देशाची सर्वात मोठी कोंडी होत आहे. अगदी रोजच्या कांदे बटाट्याच्या व्यापारापासून ते साखरेच्या आयातनिर्यातीपर्यंत पाकिस्तानचे भारताशी रोजचे आर्थिक व्यवहार होत होते. परंतु पुलवामा हल्ल्यानंतर भारताने यासंदर्भात अतिशय कठोर धोरण स्वीकारले. आणि भारताकडून आतापर्यंत पाकिस्तानला एक शेजारी राष्ट्र म्हणून जेवढी काही सढळ हस्ते मदत होत होती त्याला लगाम घातला. अनेकवेळेला तर भारताने स्वतःच्या वाट्याचे कितीतरी पाणी पाकिस्तानला देऊ केलेले आहे. भारताने ते पाणीही आता बंद केल्याने पाकिस्तानचे कृषी आणि औद्योगिक स्वरुपाचेही नुकसान होताना दिसते. जे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानला कोणतीही मदत मिळत नाही आणि शेजारचे राष्ट्र म्हणून भारताकडूनही मदत मागता येत नाही अशी आज पाकिस्तानची परिस्थिती झाली आहे. केवळ दहशतवादाचा पुरस्कार केल्यामुळे जगाकडून पाकिस्तानचा तिरस्कार होताना स्पष्टपणे दिसून येते. अतिधर्मांधपणा हा तसा विनाशाला कारणीभूत ठरतो. याचे एक ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल. लष्कराने आपल्या अनाठायी खर्चामध्ये कपात करणे याचा अर्थ पाकिस्तानच्या सामाजिक स्तरावर फार मोठी आर्थिक कोंडी निर्माण झाल्याचे ते निदर्शक आहे. हे वृत्त जगभर जेव्हा पसरते त्यावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानमध्ये आर्थिक दुर्दशा असल्याचे एकाअर्थी मान्य केले जाते. त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर सहानुभूती मिळवावी आणि आपल्या आर्थिक समस्या सोडवून ठेवण्याचा प्रयत्न करावा हाच पाकिस्तानचा त्यामागचा हेतू आहे.

## आर्थिक सुरक्षा की सुरक्षा

याबरोबरीने पाकिस्तानला आणखी काही उपाय करावे लागतील तरच जगातील काही प्रमुख राष्ट्रांची पाकिस्तानविषयी खात्री पटेल. जे लष्कर दहशतवाद्यांचे पालन पोषण करते त्या लष्कराने आपल्या खर्चात कपात करणे ही वैशिष्टपूर्ण गोष्ट ठरते. परंतु कपात करताना अधिक काही धोरणात्मक बाबींची पूर्तता जर पाकिस्तानने केली तर अगदी भारतसुध्दा काही प्रमाणावर मदत करू शकतो. सर्वप्रथम दहशतवाद्यांना होणारा अर्थपुरवठा पाकिस्तानने थांबवला पाहिजे. काश्मिरमधल्या फुटीरतावाद्यांना केली जाणारी थेट आर्थिक मदत ताबडतोब थांबवली पाहिजे. अशा काही गोष्टी करण्याचे वचन जर पाकिस्तानने दिले तर भारताकडून लादली गेलेली काही आर्थिक बंधने शिथील होऊ शकतात. आजही काश्मीरमध्ये पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देऊन भारतीय लष्करावर दगडफेक केली जात आहे. दगडफेक करणाऱ्या या तरुणांना पाकिस्तानमधल्या दहशतवादी संघटना मदत करताना दिसतात. पाकिस्तानने मसूद अझर किंवा हाफीज सैद या दोघांच्याही मुसक्या आवळून त्यांना भारताच्या हवाली केले तरीदेखील भारत पाकिस्तानवर काही प्रमाणात विश्वास ठेवू शकेल. हीच अतिशय महत्त्वाची वेळ आहे की पाकिस्तानने स्वतःचा प्रामाणिकपणा सिध्द करावा. आपण दहशतवादाच्या विरोधात आहोत हे जगाला दाखवून द्यावे. किंबहुना आर्थिक स्थिरता हवी की दहशतवाद हवा यातील एका गोष्टीची निवड करण्याचे धैर्य पाकिस्तानने दाखवावे. लष्करावरील खर्च कमी करण्याची वेळ येते. याचा अर्थ त्या देशाची आर्थिक स्थिती बिघडलेली आहे. हे सिध्द होते. हा खर्च करीत असताना आम्ही आमच्या सुरक्षिततेशी कोणताही समझोता करणार नाही, असे विधान पाकिस्तानने केले असते तरी त्यात काही अर्थ नाही.